Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 11 October 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ सकाळी ११.०० वाजता

****

प्रधानमंत्री धन –धान्य कृषी योजनेचा शुभारंभ आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं होत आहे. उत्पादकता वाढ, उत्पादन शाश्वतता निश्चिती, पिक काढणी तंत्रज्ञान आणि पतपुरवठा प्रणाली मजबूतीकरण यासाठी ही योजना राबवण्यात येणार आहे. यात देशभरातून निवडलेल्या शंभर जिल्ह्यांत राज्यातल्या पालघर, रायगड, धुळे, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली सह मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड आणि नांदेड या नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे.

****

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीत आघाडीबाबतचा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला जाईल, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. काल ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका महायुतीच्या माध्यमातूनच लढवण्यात येतील परंतु काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतींचे संकेत दिले आहेत. नाशिक इथं काल ते पक्षाच्या नियोजन बैठकीनंतर पत्रकारांशी बोलत होते.

दरम्यान, लातूर तसंच छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती आरक्षण सोडत परवा सोमवारी काढण्यात येणार आहे.

****

राज्यातील सर्व क्रीडा संकुलं, स्पोर्ट्स क्लब, जिमखाना, तसंच स्थानिक क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी पोषाख बदलण्यासाठी स्वतंत्र खोलीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्याचे क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. दिग्गज माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी यासंदर्भात केलेल्या आवाहनाला राज्य सरकारनं प्रतिसाद देत हा निर्णय घेतला आहे. या आवाहनाला तत्काळ प्रतिसाद देत महिलांसाठी सुविधा उपलब्ध करुन देणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं थोड्याच वेळात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाईची मदत मिळावी या मागणीसाठी हंबरडा मोर्चा काढण्यात येत आहे. सकाळी अकरा वाजता क्रांती चौक इथून मोर्चाला सुरुवात होईल. विभागीय आयुक्तालय इथं हा मोर्चा जाणार आहे. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती, हेक्टरी पन्नास हजार रुपयांची मदत, पीक विमा निकष न बदलणे तसंच घरं-पशुधन विषयक निकष शिथील करावी आदी मागण्यांचा यात समावेश आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेनं या वर्षापासून बालवाङ्मयासाठी रघुनाथ शिवराम बोरसे हा विशेष पुरस्कार सुरू केला आहे. पहिला पुरस्कार पुण्यातले पत्रकार संजय ऐलवाड यांच्या 'झिब्राच्या कथा' ह्या बाल कथासंग्रहाला जाहीर झाला आहे. उद्या रविवारी संध्याकाळी मसापच्या डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात हा पुरस्कार ऐलवाड यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याचं, मसापकडून सांगण्यात आलं आहे.

****

परभणी जिल्ह्यातील सर्व पात्र पदवीधर मतदारांनी प्रत्यक्ष किंवा ऑनलाईन अर्ज भरून पदवीधर मतदार नोंदणी करावी, असं आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केलं आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी महाइलेक्शन डॉट जीओव्ही डॉट इन या लिंकचा वापर करावा तर प्रत्यक्ष नोंदणीसाठी अर्ज क्रमांक १८ सह आवश्यक कागदपत्रं तहसिल कार्यालयात सादर करावे असंही जिल्हाधिकारी चव्हाण यांनी म्हटलं आहे.

****

मध्य रेल्वेतर्फे सणांच्या पार्श्वभूमीवर, मराठवाड्यासाठी मुंबईहून छत्रपती संभाजीनगरमार्गे परभणी ते सिंकदराबाद विभागातील करीमनगर इथं जाणारी विशेष २२ डब्यांची वातानुकुलीत रेल्वेगाडी सुरु करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सीएसटी-मुंबई ते करीमनगर गाडी क्रमांक शुन्य एक शुन्य दोन एक ही रेल्वे आज रात्री बारा वाजून वीस मिनिटांनी सीएसटीहून सुटून उद्या सकाळी चार वाजून पाच मिनिटांनी करीमनगरला पोहोचेल. तर,परतीच्या प्रवासात गाडी क्रमांक शुन्य एक शुन्य दोन दोन ही रेल्वे करीमनगरहून आज सायंकाळी साडेपाच वाजता सुटून सीएसटीला उद्या दुपारी एक वाजून पन्नास मिनिटांनी पोहोचेल. मनमाड, नगरसोल, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलु, परभणी, पुर्णा, नांदेड, मुदखेड, धर्माबाद या स्थानकावर ही रेल्वे थांबणार आहे.

****

आयसीसी महिला एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज कोलंबो इथं इंग्लंडचा सामना श्रीलंकेशी भारतीय वेळेनुसार दुपारी ३ वाजता सुरू होईल. तत्पुर्वी या स्पर्धेत भारतीय महिला संघाने तीनपैकी आपल्या दोन सामन्यात विजय मिळवला आहे. भारतीय संघ गुणतालिकेत चार गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे.

****

दिल्ली इथं सुरु असलेल्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी आज भारतानं तीन बाद ४०६ धावा केल्या आहेत. आज सकाळच्या सत्रात यशस्वी जयस्वाल १७५ धावांवर बाद झाला. सध्या कर्णधार शुभमन गिल ६७ तर नितिशकुमार रेड्डी ४० धावांवर खेळत आहेत. भारताकडून साई सुदर्शननं ८७ धावांचे आणि केएल राहुलनं ३८ धावांचं योगदान दिलं. यापुर्वी अहमदाबाद इथं झालेला पहिला कसोटी सामना भारतानं जिंकला आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या मौजे कपिलधारवाडी आणि मौजे हिंगणी खुर्द या गावांच्या पुनर्वसनासंदर्भात काल बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पुनर्वसनाचं काम नियोजनबद्ध आणि तातडीनं पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

****